## संक्षिप्त

### अमित शहा यांच्या बॅगांची हिंगोलीमध्ये तपासणी



**हिंगोली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बॅगांची शुक्रवारी हिंगोली येथे तपासणी करण्यात आली. शहा यांनी एक्सवर पोस्ट करीत याविषयी माहिती दिली. निकोप लोकशाहीसाठी निवडणूक आयोग करीत असलेल्या या तपासणीचे त्यांनी समर्थन केले आहे. शहा यांची दुपारी हिंगोलीत सभा होती. या सभेसाठी त्यांचे हेलिकॉप्टर उतरल्यानंतर उपस्थित असलेल्या आचारसंहिता पथकातील कर्मचाऱ्यांनी हेलिकॉप्टरमधील त्यांच्या बॅगा तपासल्या. त्यासंबंधीचा व्हिडीओ शहा यांच्या सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. अलीकडेच उद्धव ठाकरे यांच्या बॅगा वणी, औसा येथे तपासल्यानंतर त्यांनी नाराजी नोंदविली होती.


### राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी न्यायमूर्ती भूषण गवई

**सांगली :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश पी. के. शर्मा व सचिव गि. ग. कांबळे यांनी दिली. राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी भूषण गवई यांना नियुक्तीचे पत्र नुकतेच दिले आहे. तसे राजपत्रदेखील प्रसिद्ध करण्यात आले आहे. विधी सेवा कायदा, १९८७ रामाच्या कलम ३ च्या १ उपकलम (२) खंड (बी)द्वारे असलेल्या अधिकारांनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.

### मविआ उमेदवाराची बदनामी; शायना एन.सी.सह तिघांवर गुन्हा

**भाईंदर :** मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार मुज्जफर हुसैन यांच्याविरोधात विविध समाजमाध्यमांवर व्हिडिओ टाकून धार्मिक तेढ निर्माण केल्याच्या आरोपावरून भाजपच्या प्रवक्त्या आणि मुंबादेवी मतदारसंघाच्या उमेदवार शायना एन. सी. यांच्यासह तिघांच्या विरोधात मीरारोड पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. तसेच बदनामीकारक संदेश पोस्ट करणाऱ्या इतर पाच जणांवर मीरारोड पोलीस ठाण्यात ६ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

# गुजरातच्या भूमिपुत्रांसाठी लढणाऱ्या मनसेला धडा शिकवा : आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला नेण्यास पाठिंबा देणाऱ्या आणि बाळासाहेब ठाकरेंचा शिवसेना पक्ष फोडणाऱ्या नरेंद्र मोदींना पाठिंबा देणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला धडा शिकवा, अशी हाक आदित्य ठाकरे यांनी माहीम मतदारसंघातील सभेत दिली.

या मतदारसंघात राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे, शिवसेना(शिंदे) गटाचे विद्यमान आमदार सदा सरवणकर आणि शिवसेना(उबाठा) गटाचे आमदार महेश सावंत यांची तिरंगी लढत चर्चेचा विषय ठरली आहे. शिवसेनेची स्थापना ज्या खांडके इमारतीच्या परिसरात झाली त्याच इमारतीत आदित्य यांची सभा शुक्रवारी झाली.

**● ज्या मोदींनी बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेला पक्ष फोडला, त्याचे चिन्ह पळविले अशा मोदींना मनसेचा बिनशर्त पाठिंबा आहे. त्यामुळे मनसेला धडा शिकवा, अशा शब्दांत आदित्य ठाकरेंनी मनसेवर हल्ला चढविला.**

आदित्य म्हणाले, मी कोणावरही टीका करणार नाही. माझ्यावर चांगले संस्कार आहेत. ही लढाई दोन कुटुंबांतील नाही. मनसेची ओळख एकेकाळी मराठी माणसांसाठी लढणारा, भूमिपुत्रांसाठी लढणारा पक्ष अशी होती. आता मात्र त्यांची ओळख गुजरातच्या भूमिपुत्रांसाठी लढणारा पक्ष अशी झाली आहे. महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातला पळविणाऱ्या नरेंद्र मोदींना मनसेचा बिनशर्त पाठिंबा आहे. भाजप महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर राज्यातील ५ लाख भूमिपुत्रांचे रोजगार गुजरातला पळविण्यात आले. मोदींनी महाराष्ट्रातील रोजगार पळवून गुजरातेत आणल्याबद्दल विजयी रॅली गुजरातमध्ये काढली. अशा मोदींना तुम्ही पाठिंबा देताय.

जरांगेंवर लाठीहल्ल्याचा आदेश देणारे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मनसेचा पाठिंबा आहे, बदलापूरमधील महिलांवर अत्याचार करणा-यांविरोधात लवकर गुन्हे दाखल न करणाऱ्या फडणवीसांना मनसेचा पाठिंबा आहे, असेही आदित्य म्हणाले.

**सरवणकरांवर यूएपीए लावणार**

शिवसेना शिंदे गटाचे सदा सरवणकर यांच्यावर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार २३ तारख-ेला आल्यावर सर्वप्रथम दहशतवाद प्रतिबंधक कायदा असलेल्या यूएपीएअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली.

## आसियान शिखर परिषदेत भारत, चीनच्या संरक्षणमंत्र्यांची बैठक होणार

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि चीनचे संरक्षणमंत्री डोंग जून यांची आसियान शिखर परिषदेत भेट होणार आहे. गेल्या महिन्यात पूर्व लडाखमध्ये दोन्ही देशांच्या सैन्यांनी माघार घेतल्यानंतर आणि भारताने गेल्या आठवड्यात डेपसांग भागात पुन्हा गस्त सुरू केल्यानंतर ही पहिलीच मंत्रिस्तरीय बैठक असेल.

२० नोव्हेंबरपासून लाओसमध्ये सुरू होणाऱ्या दोन दिवसीय १० देशांच्या आसियान शिखर परिषदेच्या दरम्यान दोन्ही देशांचे संरक्षणमंत्री भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. एप्रिल २०२३ नंतर दोन्ही देशांचे संरक्षणमंत्री प्रथमच भेटणार आहेत.

एप्रिल २०२३ मध्ये चीनचे मंत्री ली शांगफू शांघाय शिखर परिषदेसाठी दिल्लीत आले होते. दोन्ही देशांकडून एकमेकांवर विश्वास प्रस्थापित करण्यासाठी या बैठकीकडे पाहिले जात आहे.


**पंजाब एण्ड सिंध बैंक**
**PUNJAB & SIND BANK**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुंबई अंचल

**जागेची आवश्यकता**

शाखा उघडणे / स्थलांतरित करण्यासाठी निम्न परिसरात तळमजल्यावरील जागा किमान १५ वर्षांसाठी भाडेपट्टीवर घेण्यास बँक इच्छुक आहे.

| शाखेचे नाव व परिसर | चटई क्षेत्र चौ.फूट |
|---|---|
| वांदे, जि. मुंबई उपनगर, मुंबई, महाराष्ट्र | १२००–१५०० |

इच्छुक पक्षांकडून दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये निर्धारित नमून्यात तांत्रिक व आर्थिक बोलीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये मोहोरबंद निविदा जमा करण्याची अंतिम तारीख **५ डिसेंबर २०२४** आहे.

अधिक तपशीलाकरिता बँकेच्या वेबसाइट **www.punjabandsindbank.co.in** ला भेट द्या.

**आंचलिक प्रबंधक, मुंबई**


## नाशिकला शिवसेना ठाकरे गट-भाजप समर्थकांत राडा

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सिडकोतील सावता नगर परिसरात मतदार स्लिप वाटप करण्याच्या बहाण्याने पैसे वाटप होत असल्याच्या आरोपावरून भाजप आणि शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवारांचे समर्थक भिडले. त्यात दोन्ही गटांतील दोघांना दुखापती झाल्या आहेत.

दोन्ही गटातील समर्थकांनी हत्यारे, बंदुकीचा वापर केल्याचा आरोप-प्रत्यारोप झाला. मात्र, सीसीटीव्हीत हत्यारे आढळून आली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघातून भाजपच्या वतीने सीमा हिरे व शिवसेना ठाकरे गटातर्फे सुधाकर बडगुजर निवडणूक लढवत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सावता नगर येथील हनुमान मंदिराजवळ दुपारी दोन्ही गटाचे समर्थक समोरासमोर आले. त्यातून वाद झाल्यानंतर हाणामारी झाली. यात दोन्ही गटातील एक - एक कार्यकर्त्यास दुखापत झाली आहे.

## मुलीला विरोधात उभे करणे ही शरद पवारांची चूक : आत्राम

**गडचिरोली : पुढारी वृत्तसेवा**

माझ्याविरुद्ध माझ्या मुलीला उभे करणे ही शरद पवार यांच्या राजकीय जीवनातील मोठी चूक असल्याचे धर्मरावबाबा आत्राम यांनी म्हटले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आहेरी विधानसभा मतदारसंघात वडील विरुद्ध मुलगी असा सामना पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर यासाठी धर्मरावबाबा आत्राम यांनी शरद पवार यांच्यावर निशाणा साधला.

अहेरी मतदारसंघात माझी मुलगी माझ्या विरोधात सली तरी त्यामुळे फारसा फरक पडणार नाही. येत्या २३ तारखेला निकाल जाहीर होईल तेव्हा माझी मुलगी चौथ्या किंवा पाचव्या क्रमांकावर असल्याचे तुम्हाला पाहायला मिळेल. मी राजकीय क्षेत्रात गेली ५२ वर्षे कार्यरत आहे. चार वर्षे आधीच अहेरी मतदारसंघाची जबाबदारी माझी मुलगी आणि जावई यांच्याकडे दिली होती. आता ते शरद पवार यांच्याकडे का गेले हे मला माहीत नसल्याचे आत्राम यांनी म्हटले आहे. शरद पवार यांनी माझे घर फोडण्याचे काम केले आहे.


**पश्चिम रेल्वे**
**स्टोअर्स विभाग**
**पी-वे आणि इतर विविध भंगारासाठी डिसेंबर २०२४ मध्ये ई-लिलाव विक्री**
**विशेष लक्ष द्या : सर्व पोलाद खरेदीदार आणि री-रोलर्स**

पी. वे भंगार, रेल्वे भंगार आणि इतर विविध भंगार साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी जाहीर ई-लिलाव **डिसेंबर २०२४** मध्ये खाली दिलेल्या कार्यक्रमानुसार होईल :

| पहिली फेरी | दुसरी फेरी | डेपो/विभाग | प्रभारी अधिकारी | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|
| ०३/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | प्रतापनगर | डे. मुख्य सामग्री व्यवस्थापक-प्रतापनगर | ०२६५२६४१५९२ ०९७२४०९१७५० |
| ०४/१२/२०२४ | १७/१२/२०२४ | महालक्ष्मी | डे. मुख्य सामग्री व्यवस्थापक-महालक्ष्मी | ०२२-२४९२९५७१ ०९००४४९५७५० |
| ०४/१२/२०२४ | १७/१२/२०२४ | पार्डी | डे. मुख्य सामग्री व्यवस्थापक-महालक्ष्मी | ०२२-२४९२९५७१ ०९००४४९५७५० |
| ०५/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | रतलाम | वरीष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक-रतलाम | ०७४१२२३००८० ०९७५२४९२७५० |
| ०९/१२/२०२४ | १९/१२/२०२४ | वडोदरा | वरीष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक-वडोदरा | ०२६५२६४१५९२ ०९७२४०९१७५० |
| १०/१२/२०२४ | २०/१२/२०२४ | भावनगर परा | वरीष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक-भावनगर परा | ०२७८२४४४३६० ०९७२४०९७७५० |
| १०/१२/२०२४ | २३/१२/२०२४ | मुंबई सेंट्रल | वरीष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक-मुंबई सेंट्रल | ०२२-२३०९४१४२ ०९००४४९९००६ |
| ११/१२/२०२४ | २४/१२/२०२४ | अहमदाबाद | वरीष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक-अहमदाबाद | ०७९२२२०५८८८ ०९७२४०९३७५० |
| ११/१२/२०२४ | २४/१२/२०२४ | राजकोट | वरीष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक-राजकोट | ०२८१२४७६९४३ ०९७२४०९४७७० |
| १२/१२/२०२४ | २७/१२/२०२४ | दाहोड | डे. मुख्य सामग्री व्यवस्थापक-दाहोड | ०२६७३२४१२९५ ०९७२४०९०४५५ |
| १३/१२/२०२४ | २३/१२/२०२४ | साबरमती जं. | डे. मुख्य सामग्री व्यवस्थापक-साबरमती जं. | ०७९२७५०००८० ०९७२४०९३७७४ |

तपशीलवार माहितीसाठी कृपया संबंधित डेपो/विभागीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधा.

**टीप : १)** ई-लिलावातून कोणताही लॉट मागे घेण्याचा अधिकार रेल्वेने राखून ठेवला आहे. **२)** ई-लिलाव वेळापत्रकाप्रमाणे सुरू होईल. **३)** ई लिलाव कॅटलॉग्ज साईट **www.ireps.gov.in** ई-लिलाव पोर्टलवर उपलब्ध आहेत. **४)** ई-लिलाव, डिजीटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग याबाबत काही सहाय्याची आवश्यकता असेल तर, कृपया वर नमूद केलेल्या डेपो/विभागीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधा. **५)** सर्व पैशाचे व्यवहार हे ऑनलाईन पेमेंट गेटवे च्या माध्यमातून होतील. **(क्र. एस/एस३/लिलाव कार्यक्रम-१/डिसेंबर २०२४, दिनांक १३.११.२०२४)** 0743

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly



**जाहीर सूचना**

सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की प्लॉट क्र. ३२ आणि ३३, गरोडिया नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०००७७, सीटीएस क्र. १९५/३९ आणि १९५/४४ गाव घाटकोपर-किरोळ, तालुका कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा येथे स्थित इमारत महावीर सागरमधील १ल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ०३ मोजमाप बिल्ट-अप क्षेत्र ८२२ चौ. फू. (यापुढे ''सदर मालमत्ता'' असा उल्लेख) श्री. महेंद्र जीवनलाल शाह मालक आणि प्रत्येकी रू. ५०/-चे पूर्णपणे पेड-अप शेअरधारक आणि प्लॉट क्र. ३२ आणि ३३, गरोडिया नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०००७७, सीटीएस क्र. १९५/३९ आणि १९५/४४ गाव घाटकोपर-किरोळ, तालुका कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा येथे स्थित इमारत महावीर सागरमधील १ल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ०३ चे विशिष्ट क्र. ११ ते १५ (दोन्हींसहीत) मोजमाप बिल्ट-अप क्षेत्र ८२२ चौ. फू.

श्री. महेंद्र जीवनलाल शहा यांचे ४/०९/१९९७ रोजी मुंबई इथे निधन झाले. त्यांच्या मागे त्यांचे कायदेशीर वारस त्यांची पत्नी श्रीमती सोहागिनी महेंद्र शाह, पुत्र श्री. रूपेन महेंद्र शाह आणि पुत्र श्री. सौरीन महेंद्र शाह हे त्यांचे हिंदू वारसा कायदा, १९५६ च्या तरतुदींनुसार एकमेव वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी असून त्यांच्या मालमत्तेवर उत्तराधिकार नियंत्रित करत होते.

श्रीमती सोहागिनी महेंद्र शाह यांचे २७/१२/२००७ रोजी मुंबई येथे निधन झाले, त्यांच्या मागे त्यांचे कायदेशीर वारस पुत्र श्री. रूपेन महेंद्र शाह आणि पुत्र श्री. सौरीन महेंद्र शाह हे त्यांचे हिंदू वारसा कायदा, १९५६ च्या तरतुदींनुसार एकमेव वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी असून त्यांच्या मालमत्तेवर उत्तराधिकार नियंत्रित करत होते.

दोघा कायदेशीर वारसांचे कै. श्री. महेंद्र जीवनलाल शाह यांचे १००% अविभक्त हिस्सा आहे आणि १००% अविभक्त हिस्सा दोन्ही कायदेशीर वारसांमध्ये समान तऱ्हेने वितरित झाला आहे म्हणजे दोन्ही कायदेशीर वारस सदर मालमत्तेत प्रत्येकी ५०% अविभक्त हिस्सेधारक आहेत.

श्री. सौरीन महेंद्र शाह (रिलीजर) यांनी त्यांचा ५% अविभक्त हिस्सा श्री. रूपेन महेंद्र शाह (रिलीजी) यांच्या बाजूने रिलीज डीड द्वारे केला आहे.

अशा प्रकारे, वर नमूद केलेल्या मालमत्तेच्या विक्रीसंबंधी जर कुणी व्यक्ती जो श्री. महेंद्र जीवनलाल शाह यांचा कायदेशीर वारस असल्याचा दावा करत असेल आणि काही दावा, हितसंबंध किंवा हरकत असेल तर त्याने/त्यांनी ही सूचना प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांमध्ये मकवाना अँड असोसिएट्स, वकील, मुंबई उच्च न्यायालय यांच्या कार्यालयात त्यांचा पत्ता १०८, १ला मजला, गुंदेचा चेंबर, नागिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई-४००००१ याबाबत माहिती द्यावी आणि/किंवा त्यांची हरकत नोंदवावी.

दिनांक, नोव्हेंबर, २०२४चा १६ वा दिवस

**मकवाना अँड असोसिएट्स**
१०८, १ला मजला, गुंदेचा चेंबर, नागिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१
मोबाईल क्र : ९९३०३२५५५५
ईमेल : makawanaandassociates@gmail.com


# काँग्रेसने कर्नाटकात दिलेल्या ५ गॅरंटी यशस्वीपणे सुरू

## अंमलबजावणीसाठी बजेटमध्येच ५६ हजार कोटींची तरतूद : जी. परमेश्वरा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कर्नाटकात काँग्रेस पक्षाने विधानसभा निवडणुकीवेळी दिलेल्या ५ गॅरंटींची यशस्वीपणे अंमलबजाणी सुरु असून कर्नाटकातील लाखो लोक या गॅरंटींचा लाभ घेत आहेत. या ५ गॅरंटीसाठी कर्नाटक सरकारने अर्थसंकल्पातच ५६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असल्याने निधीची कमतरता असण्याचे काहीच कारण नाही असे कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वरा यांनी शुक्रवारी टिळक भवनात पत्रकार परिषदेत सांगितले.

जी. परमेश्वरा पुढे म्हणाले की, गृहलक्ष्मी गॅरंटी अंतर्गत राज्यातील सर्व महिलांच्या बँक खात्यात प्रति महिना २ हजार रुपये जमा केले जात आहेत. या योजनेचा आतापर्यत १.२२ कोटी लाभार्थीनी लाभ घेतला असून ३०,४१६ कोटी रुपये त्यांच्या खात्यात दिले आहेत.

गृहज्योती योजनेचे १.६६ कोटी लाभार्थी असून त्यावर १४,०६५ कोटींच्या निधीचे वाटप केले आहे. युवानिधी गॅरंटीखाली बेरोजगार तरुणांना महिन्याला ३ हजार रुपये दिले जात आहेत.

या योजनेचे ४.३० लाख लाभार्थी आहेत व २०० कोटींचे वाटप केले आहे. शक्ती गॅरंटीअतर्गत प्रत्येक महिलेला कर्नाटक सरकारच्या बसमधून मोफत प्रवासाची सुविधा सुरु आहे.

शक्ती गॅरंटीअंतर्गत ३१७ कोटी महिलांनी प्रवास केला असून ६१२५ कोटी रुपये आतापर्यत खर्च करण्यात आले आहेत तर अन्नभाग्य गॅरंटीअंतर्गत १० किलो धान्य मोफत दिले जात आहे. या गॅरंटीचा १.१५ कोटी लाभार्थीनी लाभ घेतला असून ८२२९ कोटींचे वाटप केले आहे, असे परमेश्वरा म्हणाले.


**जाहीर सूचना**

मी माझे अशील श्री. नमन ठक्कर यांच्या निवासी युनिट खालील अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत (''सदर युनिट'') मालमत्तेच्या हक्कांची पडताळणी करत आहे. माझे अशील यांनी श्री. निपून ठक्कर हे मे. अमी कॉर्पोरेशनचे एकमेव प्रोप्रायटर असल्याचे सादर केले आहे व ते सदर युनिटचे मालक होते व त्यांच्या मृत्यू १६.०९.२०२४ रोजी नंतर त्यांचे कायदेशीर वारस अर्थात श्रीम. विजया ठक्कर, श्री. मनन ठक्कर व श्री. नमन ठक्कर हे आहेत. पुढे सादर करण्यात येते की, नोंदणीकरण रिलीज करार दि. १४.११.२०२४ अनुसार सि. क्र. बीआरएल-३-१४४०५-२०२४ अंतर्गत नोंदणीकृत केले. श्रीम. विजया ठक्कर व श्री. मनन ठक्कर यांनी त्यांचे सर्व हक्क, अधिकार व हितसंबंध सदर युनिट मधील श्री. नमन ठक्कर यांच्या नावे केले. सर्व व्यक्तींना सदर जागेमध्ये कोणतेही दावे असल्यास तसेच विक्री, अदलाबदल, भाडेकरार, धारणाधिकार, वारसा, ताबा, जप्ती, खटला, गहाण, प्रभार वा अन्य काही असल्यास त्यांनी सदर सर्व संबंधित दस्तावेज यांच्या मूळप्रत अधोहस्ताक्षरित यांना ८, ओरिएन्टल बिझनेस सेंटर, तळ मजला, प्लॉट क्र. १४, राजाबहादूर मेंशन, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा दावे काही असल्यास ते अधित्यागीत व/वा परित्यागीत मानले जातील.

**अनुसूची**

निवासी युनिट क्र. ३०१, मोजमापित ४८४ चौ. फूट रेरा चटई क्षेत्रफळ वा त्यावरील ३ रा मजला, विनी सोलिटेअर जमिन धारक सीटीएस क्र. ८५०/ए/१ए, मोजमापित ८६३.४० चौ. मीटर वा त्यावरील गाव दहिसर, तालूका बोरिवली, मुंबई उपनगरीय जिल्हा येथील एल.टी. रोड जंक्शन व वाय. आर. तावडे रोड, दहिसर पश्चिम, मुंबई - ४०००६८ आहे.

**दि. १५ नोव्हेंबर, २०२४**

सही/-
**प्रतिक के. शाह**
**वकील, उच्च न्यायालय, मुंबई**



**पश्चिम रेल्वे**
**सिग्नलचे काम**

वरिष्ठ डीएसटीई(एन)एमएमसीटी हे **निविदा क्र. एसजी/२१६/२/१०९/डब्लूए दिनांक १४.११.२०२४ मागवत आहेत. काम आणि ठिकाण : नंदूरबार-एआरटी/एआरएमई सायडिंग सहाय्यक देखभाल सुविधांसहीत यांची तरतूद या कामाशी निगडीत आरआरआयमध्ये इन्डोअर बदल आणि आउटडोअर सिग्नलचे काम. कामाचे अंदाजे मूल्य : ₹ ३८,७६,७२८/- ई-निविदा जेथे खुले होणार ते विशिष्ट कार्यालय :** वरिष्ठ विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (उत्तर), २रा मजला, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००८ **बयाणा रक्कम : ₹ ७७,५००/- ई-निविदा कागदपत्रांच्या प्रस्तुतीसाठी अंतिम वेळ आणि दिनांक : १२.१२.२०२४ रोजी १५.०० पर्यंत. ई-निविदा खुले होण्याचा वेळ आणि दिनांक :** १२.१२.२०२४ रोजी १५.३० वाजता अधिक तपशीलासाठी कृपया आमची वेबसाईट **www.ireps.gov.in** पहा. **0744**

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly



**पश्चिम रेल्वे**
**देखभालीचे काम**

वरीष्ठ डीएसटीई/एन/एमएमसीटी हे **निविदा क्र. एसजी-६२३-१६२७-डब्लूए दिनांक १३.११.२०२४ मागवत आहेत. काम आणि ठिकाण : मुंबई विभाग, पश्चिम रेल्वेच्या फायर अलार्म सिस्टम (रावेल मेक)चे तीन वर्षांसाठी दुरूस्ती आणि देखभालीसाठी सर्व साहित्य/पार्ट्सचा पुरवठा आणि अदलाबदलीसहीत व्यापक वार्षिक देखभाल कंत्राट. कामाचे अंदाजे मूल्य : ₹ १,७७,७४,३१६/- ई-निविदा जेथे खुले होणार ते विशिष्ट कार्यालय :** वरिष्ठ डीएसटीई/उत्तर/मुंबई सेंट्रल, २रा मजला, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००८ **बयाणा रक्कम : ₹ २,३८,९००/- ई-निविदा कागदपत्रांच्या प्रस्तुतीसाठी अंतिम वेळ आणि दिनांक : १०.१२.२०२४ रोजी १५.०० पर्यंत ई-निविदा खुली होण्याचा वेळ आणि दिनांक :** १०.१२.२०२४ रोजी १५.३० वाजता. अधिक तपशिलासाठी कृपया आमची वेबसाईट **www.ireps.gov.in** पहा. **0741**

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly



**प्राइम फोकस लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय :** प्राईम फोकस हाऊस, सिटी बँकसमोर, लिंकिंग रोड, खार पश्चिम, मुंबई- ४०० ०५२
**दूरध्वनी :** ०२२-२६४८४९०० **वेबसाइट :** www.primefocus.com
**कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर (सीआयएन) : L92100MH1997PLC108981**

**सप्टेंबर ३०, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठीच्या आर्थिक परिणामांचे एकत्रित अलेखापरिक्षित स्टेटमेंट**

(₹ लाखांत)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेली सहामाही | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०९.२०२४ | ३०.०६.२०२४ | ३०.०९.२०२३ | ३०.०९.२०२४ | ३०.०९.२०२३ | ३१.०३.२०२४ |
| | | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १. | व्यवहारातून झालेली एकूण मिळकत (निव्वळ) | ८९,७०४.२० | ८१,३४४.०२ | १,०२,६३०.२५ | १,७१,०४८.२२ | २,२३,६५९.०६ | ३,९५,०५३.७४ |
| २. | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा)(करपूर्व, अपवादात्मक वस्तू) | ७,५०९.९१ | (१३,४७६.८६) | (२८,३९६.५०) | (५,९६६.९५) | (३५,२७६.९८) | (५८,६७०.६१) |
| ३. | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (विशेष वस्तूंनंतर) | ७,५०९.९१ | (१३,४७६.८६) | (२८,३९६.५०) | (५,९६६.९५) | (३५,२७६.९८) | (५८,६७०.६१) |
| ४. | करोत्तर कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (विशेष वस्तूंनंतर) | ५,०४०.६५ | (१५,८०७.६४) | (२५,६९८.७२) | (१०,७६६.९९) | (३२,९०८.०४) | (४८,८४९.०४) |
| ५. | कालावधीसाठी एकूण व्यापक मिळकत | (१०,०४०.४१) | (१७,५४४.३८) | (१६,१७७.०८) | (२७,५८४.७९) | (२८,०५९.७१) | (६४,१६२.५६) |
| ६. | समभाग भांडवल | २,९९९.०७ | २,९९८.४९ | २,९९५.३७ | २,९९९.०७ | २,९९५.३७ | २,९९८.४९ |
| ७. | राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) मागील वर्षाच्या लेखापरिक्षित बॅलन्सशीटमध्ये दाखवल्याप्रमाणे | | | | | | ४८,६०३.६८ |
| ८. | दर शेअर मिळकत (अपवादात्मक वस्तूंनंतर) (प्रत्येकी रू.१/-) (वार्षिक न केलेले) | | | | | | |
| | अ) बेसिक (₹) | १.६८ | (५.२७) | (८.५८) | (३.५९) | (१०.९९) | (१६.३१) |
| | ब) डायल्युटेड (₹) | १.६२ | (५.२७) | (८.५८) | (३.५९) | (१०.९९) | (१६.३१) |

**स्वतंत्र आर्थिक परिणामांची महत्त्वाची आकडेवारी** (₹ लाखांत)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | कालावधी संपला | | वर्षअखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०९.२०२४ | ३०.०६.२०२४ | ३०.०९.२०२३ | ३०.०९.२०२४ | ३०.०९.२०२३ | ३१.०३.२०२४ |
| | | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १. | उलाढाल (निव्वळ विक्री) | १,४८३.७० | १,०७२.७७ | ७५३.९५ | २,५५६.४७ | १,४७२.३२ | ३,३४४.७५ |
| २. | नफा/(तोटा) करपूर्व | (९३९.००) | २१,४३७.५१ | (३८.३२) | २०,४९८.५१ | (१३३.३६) | (६०.८०) |
| ३. | नफा/(तोटा) करपश्चात | (६८४.८८) | २२,१०२.३० | १८.८६ | २१,४१७.४२ | १.१० | (३४.१५) |

१. वरील तिमाही आर्थिक परिणामांच्या तपशीलवार प्रारूपाचा सारांश असून हा स्टॉक एक्सेंजमध्ये सेबीच्या नियम ३३ (लिस्टींग अँड ऑब्लिगेशन्स डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम,२०१५ नुसार दाखल करण्यात आला आहे. आर्थिक परिणामांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्स्चेंज वेबसाईट www.nseindia.com आणि www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाईट www.primefocus.com वर उपलब्ध आहे.
२. वरील आर्थिक परिणाम हे लेखा परिक्षण समितीने परिक्षण केलेले आहेत आणि नोव्हेंबर १४,२०२४ रोजी झालेल्या बैठकीत संचालक मंडळाने मंजूर केलेले आहेत.

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : नोव्हेंबर १४,२०२४**

**प्राइम फोकस लिमिटेडकरिता**
**स्वाक्षरी/-**
**नरेश मल्होत्रा**
**अध्यक्ष व पूर्णवेळ संचालक**
**डीआयएन : ०००४५९७**



**जाहीर नोटीस**

माझे अशिल **सौ. वासंती हरिश्चंद्र कदम**, ६०३/२, अभिषेक इमारत, लक्ष्मीनरसिंह रामचंद्र पापन मार्ग, लोखंडवाला निवासस्थानाजवळ, गांधी नगर, वरळी, मुंबई-४०००१८ यांचे पती **श्री. हरिश्चंद्र भिकाजी कदम** ही मे. स्वान मिल, शिवडी, मुंबईतील गिरणी कामगार म्हणून काम करत होते व त्यांचे ०४/०१/२०१४ रोजी निधन झाले आहे. सदर मयत मिल कामगार **श्री. हरिश्चंद्र भिकाजी कदम** यांच्या मृत्यूनंतर माझे अशिल **सौ. वासंती हरिश्चंद्र कदम** ह्या पत्नी, **श्री. आत्माराम हरिश्चंद्र कदम** हे त्यांचे पुत्र, **सौ. हर्षाली हंसराज बापर्डेकर** (पूर्वीचे नाव: **लता हरिश्चंद्र कदम**) आणि **सौ. लक्ष्मी उमेश पवार** (पूर्वीचे नाव: **लक्ष्मी हरिश्चंद्र कदम**) विवाहित मुली या त्यांच्या सरळ आणि कायदेशीर वारसदार आहेत.

सदर वारसांबद्दल कोणाला काही आक्षेप असल्यास कृपया माझ्या खाली दिलेल्या पत्त्यावर किंवा जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई येथे पुराव्यांसह ७ दिवसांच्या आत संपर्क साधा.

दिनांक : **१६/११/२०२४**

सही/-
**ॲड. सुजाता आर. बाबर**
पत्ता : २६, गौरताज बिल्डिंग २२१,
डॉ. बी. ए. रोड, हिंदमाता, दादर (पू), मुंबई-४०००१४
मोबाईल क्र. ९८२११६१३०२



**पश्चिम रेल्वे**
**ई-लिलाव आवाहनाच्या सूचनेचे प्रकटन**

मुंबई विभागात सर्वसाधारण पैसे द्या आणि वापरा प्रसाधनगृह ब्लॉक्सचे सुचालन आणि देखभाल यासाठी कंत्राटासाठी ई-लिलाव आमंत्रित करण्यात आला आहे **लिलाव कॅटलॉग क्र : एमएमसीटी-पीएनयुटी-२४-३० कंत्राटाचा प्रकार :** सामान्य कंत्राट **श्रेणी :** पैसे द्या आणि वापरा प्रसाधनगृह ब्लॉक्स **स्थानक आणि ठिकाण : विले पार्ले, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली स्थानके. कंत्राट कालावधी : ३ वर्षे, ई-लिलावाची तारीख : २७.११.२०२४ ई-लिलावाची वेळ :** १२.०० वाजता **टीप :** प्रस्तावित बिडर्सनी आयआरईपीएस वेबसाईट **(www.ireps.gov.in)** वरील ई-लिलाव लिजिंग मोड्यूल पहावे. उपनिर्दिष्ट कॅटलॉग अंतर्गत लॉटनुसार तपशील तेथे उपलब्ध आहेत. सुरुवातीचा उपशमन कालावधी ३० मिनिटांचा असेल. सलग लॉट क्लोजिंग मध्यंतर १० मिनिटांचे असेल. लॉटनुसार क्लोजिंगच्या वेळा या आयआरईपीएसच्या ई-लिलाव मोड्यूलवर पाहता येतील. **0737**

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly



Consumer Complaint No. 42/2024

**BEFORE HON'BLE DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMISSION, HAVERI**

Complainant: Sri Iranagouda S/o Rudragouda Huded
V/s
Opponents: DEXPRESS™
Manufacturers of Two wheeler Electric Bikes, No. 346B, Oshiwara Industrial Centre, Opposite Bus Depot, 42-B, New Link Road, Goregaon West, Mumbai-400104.

**NOTICE U/O 5 RULE 20(A) OF CPC**

Whereas in the above named Sri Iranagouda S/o Rudragouda Huded has made a complaint against you the Opponent, U/s 35 of The Consumer Protection Act, 2019, with regard to the manufacturing defect in E-LITE ELECTRIC SCOOTER250W, 25km/HR Max Speed having Yellow Colour, deficiency in service and unfair trade practice.

You are hereby warned to appear in this Commission in person or by a pleader duly instructed and authorised on the date of 29-11-2024 at 10:30 A.M, to show cause against the Complaint, failing which, the said complaint will be heard and determined exparte.

Given under my hand and seal of the Commission, on this 15-11-2024.

**Advocate for Complainant**
**Sd/-**
**Sri V.V.Sappannavar, Advocate, Haveri.**

Sd/- Assistant Registrar
District Consumer Disputes Redressal Commission Haveri. 15/11/2024


# भाजपचे अध्यक्ष नड्डा यांनी साधला व्यावसायिकांशी संवाद

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने चांगले काम केल्यामुळे राज्यात पुन्हा युतीचे येणार, असा विश्वास भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी शुक्रवारी व्यक्त केला. ठाण्यातील प्रतिष्ठित व्यक्ती, व्यावसायिक, उद्योगपतींसह प्रभावशाली ठाणेकरांशी त्यांनी संवाद साधला.

ओबीसींचे चॅम्पियन म्हणविणारे काँग्रेस नेते राहुल गांधी हे आपल्या मोहबतच्या दुकानात तुष्टीकरण, देश विभाजन, जातीपातीसह द्वेषाचे सामान विकत असून मोदींना विरोध करता करता आता ते देशाला विरोध करू लागल्याचा गंभीर आरोप नड्डा यांनी काँग्रेसवर केला.

**नड्डा यांना गुरुद्वारातून बाहेर काढले**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नड्डा यांनी ठाण्यातील मेळाव्यापूर्वी गुरुद्वारला भेट दिली, तेव्हा तेथे सत्संग सुरू होता. नड्डांसोबत संजय केळकर, निरंजन डावखरे आदी नेते होते. हे सर्वजण अचानक सत्संगमध्ये गेल्याने गुरुद्वाराच्या पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त करीत नड्डा यांना तेथून बाहेर जाण्यास सांगितले.

# साहित्य संमेलनासाठी सवलतीत रेल्वे नाही

**ठाणे/नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा दिल्लीत होत आहे. मात्र मराठी साहित्य संमेलनासाठी पुणे ते दिल्ली सवलतीच्या दरात विशेष रेल्वे देण्यास रेल्वेमंत्र्यांच्या कार्यालयाने नकार दिल्याचे शुक्रवारी संयोजकांना कळविण्यात आले. तशी माहिती सरहदचे संजय नहार यांनी दिली.

आता महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आणि दिल्लीतील मंत्र्यांनी यासाठी प्रयत्न करून देशाच्या राजधानीत होणारा मराठी भाषेचा उत्सव दिमाखदार होण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन संजय नहार आणि लेशपाल जवळगे यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

यापूर्वी २०१५ तसेच १९५४ सालीही केंद्र सरकारने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी सवलतीच्या दरात रेल्वे उपलब्ध करून दिली होती. २०१५ साली तर सुरेश प्रभू यांनी दोन रेल्वे यासाठी मंजूर केल्या होत्या. म्हणूनच ७० वर्षांनंतर दिल्लीत होणाऱ्या संमेलनासाठी केंद्र सरकारने रेल्वे मंजूर करण्यासाठी सरहद संस्था प्रयत्नशील होती. मात्र या प्रयत्नांना यश आले नाही.


**नमुना झेड**
(नियम १०७ पोट नियम ११ ड (०१))
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेतल्याबाबतची जाहीर नोटीस**

पुष्पक को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मुंबई ज्या अर्थी खाली सही केलेल्या वसुली अधिकारी **श्री. राहुल तानाजी मरगजे** यांनी (महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० कलम १५६ चे नियम १०७ नुसार) दिनांक **२५.०८.२०२३** रोजी मागणी नोटीस ऋणको **श्री. पांडुरंग केशव वाघमारे** यांना देवून नोटीस मध्ये नमूद केलेली रक्कम **रू. ४,२९,५१३/- (रू. चार लाख एकोणतीस हजार पाचशे तेरा फक्त)** सदरची नोटीस मिळालेल्या दिनांका पासून ऋणको यांनी भरणा करणेस कसुर केली आहे. वसुली अधिकारी यांनी दिनांक **०३.१०.२०२४** रोजी जप्तीची नोटीस दिली असुन पुढे निर्देशित केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरीकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी कायदा नियम १९६१ मधील नियम {१०७(११)(ड)(१)} अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दिनांक **२४.१०.२०२४** रोजी ताबा घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरीकांना याद्वारे सावध करण्यात येते की सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास **श्री. पांडुरंग केशव वाघमारे** यांच्या वरील कर्जाच्या बोजाची रक्कम **रू. ४,८१,१६५/-** व दिनांक **२४.१०.२०२४** पासूनचे पुढील व्याज याला अधीन रहावे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**श्री. पांडुरंग वाघमारे** यांची चैती नगर ठाणे येथील सातारकर चाळ नं. १ मधील हनुमान मंदिराजवळील रूम नं १० ची, १२ X १८ चौ फुट हि मिळकत.

ठिकाण: लोकमान्य नगर ठाणे जिल्हा ठाणे
दिनांक: **२४.१०.२०२४**

शिक्का

**सही/-**
**श्री. राहुल तानाजी मरगजे**
**वसुली अधिकारी**
(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ व अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त)



**एल्&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बि प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** मुंबई

L&T Finance

**ताबा सूचना**
**[नियम-8(1)]**

जसे की, खालील स्वाक्षरी करणार एल्&टी फायनान्स लिमिटेडचा (आधीचे नाव, एल्&टी हाउसिंग फायनान्स होल्डिंग्ज लि.) अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस आणि एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम, 2002 [नियम 3] सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13(12) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून एक मागणी सूचना जारी केली असून त्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना सदर सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांचे आत खाली नमूद करण्यात आलेल्या मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम व मागणी सूचनेच्या तारखेपासून ते पैसे भरेपर्यंत/वसूल होईपर्यंत त्यावरील अधिक व्याज आणि इतर शुल्क इतक्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले होते. कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांनी सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे ह्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना आणि सर्वसाधारण जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की खालील स्वाक्षरी करणार यांनी ह्या सूचने संदर्भात सदर नियम कमल 8 सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13 अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

| कर्ज खाते क्रमांक | कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्सचे नाव | गहाण मालमत्तेचा तपशिल | मागणी सूचना | | ताबा घेतल्याची तारीख व प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | थकित रक्कम (₹) | |
| MUMHF144 54679 | 1)आरती अरुण गाडगीळ कर्जदार म्हणून आणि 2)मंदार ए गाडगीळ | अनुसूची -I अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : दुकान क्र. 70/अ, अधिमापन सुमारे 6.14 चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ, पहिला मजला, ''सनरेज शॉपिंग सेंटर'', शहर सर्व्हे क्र. आयसीआय/56 येथे स्थित, कांदिवली गाव, तालुका बोरिवली, मुंबई उपनगर जिल्हा, नोंदनी उपजिल्हा वांद्रे. | 15.07.2024 | 09-07-2024 रोजीनुसार रु. 43,71,320.81/- | 12.11.2024 प्रतिकात्मक ताबा |

कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना खास करून आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार न करण्याची खबरदारीची सूचना देण्यात येत आहे आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास तो एल्&टी फायनान्स लिमिटेड यांना मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम आणि त्यासोबत मागणी सूचनेपासून ते पैसे अदा करेपर्यंत/वसूल होईपर्यंत अधिक व्याज व इतर शुल्क इत्यादी भरण्याच्या अधीन असेल.

**दिनांक:** 16.11.2024
**ठिकाण:** मुंबई

स्वाक्षरी/–
**अधिकृत अधिकारी**
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड